


दैनिक
महाराष्ट्राचा बुलंद आवाज ● छत्रपती संभाजीनगर ● जालना ● बीड ● परभणी ● लातूर ● नांदेड ● धाराशिव ● हिंगोली ● अहिल्यानगर

# मराठवाडा पत्र

■ संपादक : दत्तात्रय सखाराम नरनाळे ■

●बीड(महाराष्ट्र) ●वर्ष ५ वे ●अंक १७७ ●शुक्रवार, दि. २६ सप्टेंबर २०२५ ●RNI-MAHMAR/2021/80074 ●Post: Reg.No.L/226/RNP/Renewal/2025-2027 ●पान १ ●पाने ४ ●किंमत ३ रूपये

● dailymarathwadapatra2021@gmail.com ● https://marathwadapatra.com ● https://epaper.marathwadapatra.com ● Mo. 9822152955




## नवरात्र उत्सव

पाचवी माळ



पंचमीचे दिवशीं व्रत ते
उपांगललिता हो ।
अर्घ्यपाद्यपूजने तुजला
भवानी स्तवितां हो ।
रात्रीचें समयीं करिती
जागरण हरिकथा हो ।
आनंदे प्रेम तें आलें
सद्भावें क्रीडतां हो ॥
५ ॥
उदो बोला उदो अंबाबाई
माऊलीचा हो ।
उदोकारें गर्जती काय
महिमा वर्णु तिचा हो ।
उदो बोला उदो अंबाबाई
माऊलीचा हो ॥ ध्रु ॥

# पीएम केअर फंडातून महाराष्ट्रातील शेतकऱ्यांची कर्जमुक्ती करा: उद्धव ठाकरे यांची मागणी

छ. संभाजीनगर । प्रतिनिधी

पंतप्रधानांना सांगतोय की, पीएम केअर फंड आता वापरा, नाहीतर कोणाची केअर घेताय तुम्ही? पीएम केअर फंडातून शेतकऱ्यांना कर्जमुक्त करा, नाहीतर शेतकऱ्याता हेक्टरी ५० हजार रुपये द्या, अशी मागणी शिवसेना (उद्धव बाळासाहेब ठाकरे) पक्षप्रमुख उद्धव ठाकरे यांनी केली आहे.

तसेच सरकसकट कर्जमुक्तीची मागणी आम्ही शेतकऱ्यांच्या वतीने करतो आहोत... आणि ती मागणी सरकारने मान्य केली नाही



**दीड हजार रुपयात लाडक्या बहिणीचं घर सावरलं जाणार आहे का? आम्हाला याच्यात राजकारण आणयचं नाही. पण गाडीमध्ये मोबाईलवर मी चॅनलवरच्या काही बातम्या पाहिल्या. त्याच्यात आपले उपमुख्यमंत्री अजित पवार म्हणाले की, आम्ही लाडक्या बहिणीवरती ४५ हजार कोटी रुपये खर्च करतोच आहोत ना. ही मरती आहे. ४५ हजार कोटी वर्षाला तुम्ही जर का खर्च करत असाल पण लाडक्या बहीण योजनेतून जे दीड हजार रुपये त्या बहिणींच्या घरी दिले जाताहेत त्या बहिणींचं घर आजच्या या परिस्थितीत दीड हजार रुपयांत सावरलं जाणार आहे का? त्याचं उत्तरही उपमुख्यमंत्र्यांनी द्यावं, असा टोला उद्धव ठाकरे यांनी लगावला.**

तर शेतकऱ्यांच्या बरोबरीने शिवसेना रस्त्यावरती उतरल्याशिवाय राहणार नाही, असा इशाराही उद्धव ठाकरे यांनी दिला.

मराठवाडयातील पूरग्रस्तांना आणि नुकसानग्रस्त शेतकऱ्यांना भेटून उद्धव ठाकरे यांनी आज त्यांच्याशी संवाद साधला. शेतकऱ्यांच्या बांधावर जाऊन त्यांच्या व्यथा ऐकून घेतल्या. उद्धव ठाकरे यांनी तालूर, धाराशीव, बीड, जालना आणि छत्रपती संभाजीनगरचा दोरा केला. या दोऱ्यानंतर उद्धव ठाकरे यांनी छत्रपती संभाजीनगरमध्ये माध्यम ंशी संवाद साधला.

**● ही एकप्रकारे शेतकऱ्यांची थट्टा**

आज मी मुद्दाम मराठवाड्यातल्या जनतेला दिलासा द्यायला आलेलो आहे. जसं मुख्यमंत्री म्हणाले की, यात राजकारण आणू नये, तसं मला याच्याम ध्ये राजकारण ▶▶ उर्वरित पान २ वर

# बीड जिल्ह्यातील नुकसानग्रस्त भागाची उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी केली पाहणी

बीड । प्रतिनिधी

बीड जिल्ह्यातील काही भागात मुसळधार पाऊस झाल्याने जिल्ह्यातील नद्यांना आलेल्या पुरामुळे नदी काठावरील अनेक गावातील जनजीवन विस्कळीत झाले आहे. काही गावात नदीचे पाणी घरात व शेतशिवारात घुसल्याने नागरिकांचे मोठ्या प्रमाणात नुकसान झाले. या पार्श्वभूमीवर उपमुख्यमंत्री तथा बीड जिल्ह्याचे पालकमंत्री अजित पवार यांनी आज बीड जिल्ह्यातील नुकसानग्रस्त भागाचा दौरा केला. यावेळी श्री. पवार यांनी बीड तालूक्यातील मौजे पिंपळगाव घाट, मौजे हिंगणी खुर्द, मौजे आहेर चिंचोली, खामगाव, नांदूर हवेली तर शिरुर कासार तालूक्यातील खोकरमोहा आणि येवलवाडी आणि गेवराई तालूक्यातील इटकूर या गावांना भेट देवून येथील पाऊस व पुरामुळे झालेल्या नुकसानग्रस्त भागाची पाहणी केली. यावेळी उपमुख्यमंत्री पवार यांनी नागरिकांशी संवाद साधत म्हणाले की, ▶▶ उर्वरित पान २ वर







*बीड : शिवपार्क कॉलनी येथे नवरात्रउत्सवानिमित्त देवीची आरती करतांना 'दैनिक मराठवाडा पत्र'चे संपादक दत्तात्रय नरनाळे, सौ. ज्योती दत्तात्रय नरनाळे व भाविक, भक्त छायाचित्रात दिसत आहेत.*

### महाराष्ट्र लोकसेवा आयोग सेवा राजपत्रित संयुक्त पूर्व परीक्षा; उपकेद्रावर १६३ नागरिक सुरक्षा संहिता १६३ कलम लागू

बीड । प्रतिनिधी

महाराष्ट्र नागरीसेवा राजपत्रित संयुक्त पूर्व परीक्षा २०२५ एकूण ०८ उपकेंद्रावर घेण्यात येणार असून परीक्षा केंद्राचे नावे व उमदवारांची संख्या पुढीलप्रमाणे आहे. चंपावती माध्यमिक विद्यालय, नगर रोड, बीड २४०, चंपावती इंग्ली स्कुल, नगर रोड, बीड २४०, भगवान विद्यालय, ▶▶ उर्वरित पान २ वर

अक्का, मुलीच्या लग्नाची काळजी करू नका, मी आहे, मी सर्व करून देईन, लग्न दिवाळीतच होईल...

# धनंजय मुंडेंनी पुसले पूरग्रस्त शेतकऱ्यांचे अश्रू

- परळी तालुक्यातील तेलसमुख, बोरखेड, ममदापूर आदी गावांत धनंजय मुंडे यांनी केली नुकसानीची पाहणी
- 100% नुकसान भरपाई साठी पाठपुरावा करणार - मुंडेंनी ठिकठिकाणी शेतकऱ्यांशी संवाद साधत दिला धीर
- ममदापूर येथील पुरात वाहून गेलेल्या तरुणाच्या कुटुंबीयांना प्रशासनाची ४ लाखांची मदत सुपूर्द

परळी वै. । प्रतिनिधी

परळी वैद्यनाथ तालुक्यातील तेलसमुख, बोरखेड, ममदापूर आदी गावांमधील अतिवृष्टी नुकसान व पुरपरिस्थीची माजी मंत्री तथा आमदार धनंजय मुंडे यांनी पाहणी केली. या दरम्यान तेलसमुख येथील एका शेतातील



संपूर्ण कापसाच्या उभ्या पिकाचे पावसाने पूर्णपणे नुकसान झाले असून, संबंधित शेतकऱ्याच्या मुलीचे दिवाळीत लग्न प्रस्तावित आहे. या पार्श्वभूमीवर शेतकरी म हिलेला धनु भाऊंच्या समोर अश्रू अनावर झाले. शेतकरी महीलेने हाती आलेले संपूर्ण पीक नासले, लाखांवर नुकसान झाले भाऊ, आता लेकीचे लग्न कसे लावू? असा प्रश्न उपस्थित करताच धनंजय मुंडे ▶▶ उर्वरित पान २ वर

# शेतकऱ्यांना मदत मिळवून देण्यासाठी सरकारला भांडू

## ● खा.बजरंग सोनवणे यांचा शेतकऱ्यांना शब्द, केज, धारूर, परळी तालुक्यात अतिवृष्टीग्रस्तांची घेतल्या भेटी



शेतकरी कोलमडून गेला आहे. आर्थीक संकटात सापडलेल्या शेतकऱ्यांना सरकारने भरीव मदत करावी, तसे न केल्यास सोनवणे अतिवृष्टीग्रस्त भागाची पाहणी करत आहेत. केज, बीड, शिरूर मतदारसंघात दोन दिवस पाहणी केल्यानंतर दि.२५ सप्टेंबर रोजी केज तालुक्यातील दैठणा, राजेगाव, धारूर तालुक्यातील फकीर जवळा, परळीतील सिरसाळा, गोवर्धन, हिवरा, जलगव्हाण, पोहनेर, तेलसमुख, बोरखेड, ममदापूर, कौडगाव या गावातील अतिवृष्टीने झालेल्या नुकसानीची पाहणी केली. यावेळी पुढे बोलताना खा.बजरंग सोनवणे म्हणाले, दहा दिवसांपासून जिल्ह्यात अतिवृष्टी होत आहे. आधी आष्टी तालुक्यात अतिवृष्टी झाली. त्याठिकाणी मी तातडीने जावून संकटात सापडलेल्या शेतकऱ्यांची विचारपूस केली, धीर दिला. यानंतर मागील चार दिवसांपुर्वी जिल्हाभरात सर्वत्रच अतिवृष्टी ▶▶ उर्वरित पान २ वर

# बीडमध्ये किरकोळ वादातून तरुणाचा खून !



## शहरातील माने कॉम्प्लेक्स परिसरातील घटना एक संशयित आरोपी पोलिसांच्या ताब्यात

बीड । प्रतिनिधी

किरकोळ कारणावरून झालेल्या वादातून एका तरुणाचा चाकूचे वार करत खून केल्याची घटना बीड शहरात गुरुवारी रात्री घडली. या प्रकरणात पोलिसांनी एका संशयिताला ताब्यात घेतले आहे. यश देवेंद्र ढाका (२२) असे खून झालेल्या तरुणाचे नाव आहे. यश ढाका याचे एका तरुणासोबत गुरुवारी दुपारी भांडण झाले होते त्यानंतर मित्रांसह माने कॉम्प्लेक्स परिसरात त्या तरुणास भेटला. यावेळी देखील दोघांमध्ये वाद झाला आणि त्या तरुणाने यश ढाका याच्यावर चाकूचे वार केले. यावेळी परिसरात असलेल्या काही ▶▶ उर्वरित पान २ वर

# चुकीच्या पध्दतीने नदीवरील बंधाऱ्याची उंची वाढवल्याने नदी काठच्या शेत जमिनींचे नुकसान

- शेतकऱ्यांची तक्रार ; गुत्तेदाराची चौकशी करा
- पाटबंधारे विभागाने तात्काळ पंचनामे करून शेतकऱ्याला मदत करावी

शिरूर का. । प्रतिनिधी

तालुक्यातील घाटशीळ पारगाव येथील सब्र्हे नं.१६ मध्ये नदीवरील बंधाऱ्याची उंची चुकीच्या पध्दतीने वाढवल्यामुळे व अयोग्य व्यवस्थापनामुळे नदी काठच्या जमिनींचे प्रचंड नुकसान झाले ▶▶ उर्वरित पान २ वर





*बीड जिल्ह्यातील अतिवृष्टीने झालेल्या नुकसानीची पाहणी करण्यासाठी माजी मुख्यमंत्री, शिवसेना पक्षप्रमुख मा.आ. उद्धवजी बाळासाहेब ठाकरे हे आज जिल्ह्यात आले होते. त्यांची आमदार संदीप भैय्या क्षीरसागर, माजी आमदार सय्यद सलीम भाई, जिल्हाध्यक्ष राजेंद्रजी मस्के भेट घेऊन जिल्ह्यातील शेतकरी बांधवांच्या व्यथा मांडल्या.*



# कुर्ला येथे एनडीआरएफचे शौर्यपूर्ण बचावकार्य ; अनेकांचे प्राण वाचले

बीड । प्रतिनिधी

कुर्ला परिसरात आलेल्या महापुराच्या संकटात दि. २३ सप्टेंबर २०२५ रोजी एनडीआरएफच्या टीमने शौर्यपूर्ण बचावकार्य करून अनेकांचे प्राण वाचवले. गावात पाणी वेगाने शिरल्याने नागरिकांमध्ये भीतीचे वातावरण निर्माण झाले होते. १९८९ च्या पुरानंतर एवढी भयावह परिस्थिती प्रथमच गावामध्ये निर्माण झाली होती.

या भीषण परिस्थितीत एनडीआरएफच्या जवानांनी जीव धोक्यात घालून रेस्क्यू ऑपरेशन राबवले. या बचाव कार्यात इंडियन आर्मी चे निखिल अरोरा, उपविभागीय अधिकारी मॅडम कविता जाधव, तहसीलदार शेळके सर, मंडळ अधिकारी वाघ सर, ग्राम महसूल अधिकारी नेवडे सर, ग्रामविकास अधिकारी वीर सर, गावाचे सरपंच, तसेच गावातील नागरिक उपस्थित होते. त्यांच्या सहकार्यामुळे हे अभियान यशस्वी पार पडले. गावात प्रथमच एन डी आर एफ चे पथक आल्यामुळे गावातील नागरिकांनी बचाव कार्य सुरू होते त्या ठिकाणी एकच गर्दी केली होती. कुर्ला गावात घडलेल्या या कार्यामुळे अनेकांचे जीव वाचले असून गावकऱ्यांनी एनडीआरएफच्या वानांबरोबरच सर्व अधिकाऱ्यांचे मनःपूर्वक आभार मानले आहेत.



# मुसळधार, अति मुसळधार, अतिवृष्टी यापुढे ढगफुटी



कोणत्याही मुसळधार पावसाला ढगफुटी शब्द वापरण्याचा एवढा अतिरेक झालाय कि खऱ्या ढगफुटीसाठी पर्यायी शब्द शोधण्याची वेळ आली आहे. प्रत्येक मुसळधार पाऊस ढगफुटी नसते, नदीला पूर आला म्हणजे ढगफुटी नसते, शहर पाण्याखाली गेले म्हणजे ढगफुटी नसते. मुसळधार, अति मुसळधार, अतिवृष्टी असे काही पावसाचे प्रकार असतात. आणि यापुढे ढगफुटी असते.

ढगफुटीचे काही निकष असतात. सामान्यपणे एका तासात १०० मिमी जास्त पाऊस म्हणजे ढगफुटी समजले जाते. (दिवसभरात १०० नाही, तासाभरात १००) ढगफुटीवेळी ढगांची उंची १५ किलोमीटरपर्यंत असते. सामान्यपणे ढगफुटी १०-१५ किमी परिसरात होत असते, त्याच्या आजूबाजूच्या ठिकाणी सामान्य किंवा मुसळधार पाऊस असू शकतो. हा पाऊस ५ मिनिट ते २-३ तास पडू शकतो. काही वेळा एखाद दिवस सुद्धा होतो. (उदा. मुंबई २६ जुलै). ढगांतून पाण्याचा खाली येणारा लोंढा इतका प्रचंड असतो कि काही वेळा त्याच्या वेगामुळे जमिनीवर जोराचे वारे वाहायला लागते.

जगात १ मिनिटात ३६ मिमी, ५ मिनिटात ६६ मिमी, १५ मिनिटात २०० मिमी, १ तासात ४०० मिमी, १ दिवसात ११०० मिमी आणि दोन दिवसात १८०० मिमी पावसाचे रेकॉर्ड आहेत. मुंबईचा २६ जुलैचा दिवसभरात पडलेला १००० मिमी पाऊस सुद्धा ढगफुटीचा प्रकार होता. पण आता या शब्दाचा अति भडीमार सुरु आहे. मुसळधार पाऊस या शब्दाचे गांभीर्य कमी वाटते म्हणून ढगफुटी, ढगफुटीसदृश्य पाऊस असे शब्द सर्रास वापरणे सुरू आहे. ढगफुटीसदृश्य असे काहीच नसते, त्याला मुसळधार किंवा अतिमुसळधार पाऊस म्हणतात. नदी नाल्यांना पूर आला तरी त्याला ढगफुटी म्हणण्याची पद्धत रूढ झाली आहे. पण मुसळधार पावसाच्या परिस्थितीत ५०-६० मिमी पाऊस पडला तरी नदीला मोठा पूर येऊ शकतो. (दिवसभरात ६० मिमी पाऊस पडला तरी त्याला अतिवृष्टी म्हटले जाते)

पुण्यात काही ठिकाणी जोरदार पाऊस झाला, सगळीकडे पाणी साचले तर लगेच सगळे ढगफुटीचा निकष लावून मोकळे झाले. पण पावसाचे आकडे पहिले तर तीन तासात २०-३० मिमी पाऊसच झालेला दिसत आहे, काही ठिकाणी तीन तसात ७० मिमी पाऊस झालेला आहे. याला ढगफुटी म्हणायचे म्हटल्यावर तासाला १० मिमी पावासाला मुसळधार म्हणावे लागेल. मग रिमझिम पाऊस कशाला म्हणायचं?

त्या पुण्यात नाले बंद केलेत, ओढे बुजवून टाकलेत, पाणी जिरण्याचे मार्ग बंद केलेत, ड्रेनेज लाईन ४० वर्षांपूर्वीच्या आहेत, सगळं शहर काँक्रीटने झाकलं आहे, तिथे तासाभरात १०-२० मिमी पाऊस सुद्धा पुरेसा आहे कमरेइतके पाणी साचण्यासाठी. मुंबईचं जे आधीच झालेलं आहे तेच आता पुण्याचं होत आहे... ते शहर लहानश्या पावसाने सुद्धा बुडणारच आहे.

शहराच्या बाहेर येऊन ग्रामीण भागाचा विचार केला तरी पूर येण्यासाठी ढगफुटीची गरज नसते. मुसळधार पाऊस सुद्धा पुरेसा असतो. तलाव बंधारे भरलेले असतील तर दिवसभरात ५०-६० मिमी पाऊस पडला तरी पूर येऊ शकतो. एका तासात ५०-६० मिमी पाऊस पडत असेल तर तोसुद्धा खूप पाऊस असतो. पण त्याला ढगफुटी म्हणत नाहीत. त्याला अतिमुसळधार पाऊस म्हणतात. आणि एवढ्या पावसाने सुद्धा चांगला पूर येऊ शकतो. जलसंधारणाची पाणी साठवण्याची आणि जमिनीची पाणी पिण्याची क्षमता संपली कि पूर यायला सुरुवात होतेच.

मागील काही वर्षात कमी वेळात जास्त पाऊस पाडण्याचे प्रमाण वाढले आहे हा एक वातावरणाचा मोठा बदल झालेला आहे. नगरसारख्या सारख्या ठिकाणी जिथे दिवसभर रिमझिम पाऊस चालून १०-२० मिमी पाऊस व्हायचा तिथे आता एकदोन तासात २०-३० मिमी पाऊस पाडण्याचे प्रमाण वाढले आहे, आणि हा पाऊस सुद्धा मुसळधार वाटतो, हेच प्रकार ग्रामीण भागात सुद्धा वाढले आहेत. आठवडाभरापूर्वी पाथर्डी, शेवगाव मधे झालेला पाऊस हाही याच प्रकारचा दुर्मिळ पाऊस. आमच्या भागात असा मुसळधार पाऊस फार कमी होतो, दुर्मिळच. पण फक्त तो खूप झाला म्हणून ढगफुटी झाली असे नाही, तो अतिमुसळधार पाऊस आहे जो तीनचार तासाच्या कालावधीमध्ये ७०-१०० मिमी झालेला आहे. आणि अशा सपाट प्रदेशमधे महापूर येण्यासाठी हा पाऊस पुरेसा आहे, त्यासाठी ढगफुटीची गरज नाही. पावसाच्या बाबतीमधे आकर्षक आणि भीतीदायक शब्दप्रयोग मांडून विनाकारण निसर्गावर सगळं ढकलून देण्याची गरज नाही. (वर काही ढगफुटीचे आकडे सांगितले आहेत ते ४०-५० वर्षांपूर्वीचे आहेत. म्हणजे तेव्हासुद्धा असा भयंकर वाटावा असा पाऊस पडत होताच, हि काही आजकालची बाब नाही.) अतिवृष्टीमुळे जगात सगळीकडे पूर येतो. यातून अमेरिका, जपान, चीन, युरोप सारखे प्रगत देश सुद्धा सुटलेले नाहीत. पाणी जिरण्याची आणि साठण्याची क्षमता संपली कि पूर येतोच. त्यासाठी ढगफुटीची गरज नाही. पुणे मुंबईसारख्या शहरांमधे लहानश्या पावसाने पूर येणे याला पावसाचा दोष म्हणता येत नाही. याला प्रशासनाचे चुकलेले नियोजन आणि, अतिक्रमणाचा अतिरेकच कारणीभूत आहे.

पुणे किंवा पुण्यासारख्य घाटाच्या वरील राज्यातील कोणत्याही शहरात जर तासादोन तासात ५०-६० मिमी पाऊस पडला, किंवा दिवसभरात १०० मिमी पाऊस पडला तर ते शहर बुडू शकते यात दुमत नाही, कारण तिथली तेवढी पाणी धारण क्षमता नाही, त्यापेक्षा कमी असेल तर प्रशासकीय अपयश आहे. मुंबईसारख्या शहरात जिथे दिवसभरात २०० मिमी पाऊस सुद्धा सामान्य बाब आहे तिथे शे-दीडशे मिमी पावसाने शहर बुडते ते प्रशासनाचेच अपयश असते. तिथे ३००-५०० मिमी पावसाने पूर येणे आपण सामान्य समजायला हवे. पण हि शहरे तिथल्या सामान्य पावसाच्या ३०% पावसानेच बुडत आहेत. आणि ती बुडाली म्हणून तिथे ढगफुटी झाली असे म्हणून जमत नाही.

प्रत्येक गोष्टीला भयंकर करून सांगणे बंद व्हायला हवे, काही गोष्टी सामान्य असतात पण त्या कधीतरी अनुभवायला मिळतात म्हणून त्या जास्त भयानक वाटत हे लक्षात घ्यायला हवे. प्रत्येक मुसळधार पाऊस ढगफुटी नसते, पूर आला म्हणजे ढगफुटीच झाली असे नसते, ढगफुटी हि कधीतरी होणारी घटना आहे. मुसळधार, अतिमुसळधार, अतिवृष्टी याच गोष्टी कधीतरी अनुभवायला मिळतात, ढगफुटी हा त्यापुढचा टप्पा आहे.

**- प्रा. हांगे आर.एस, कृषीहवामान विषय तज्ञ ,**
**छत्रपती शाहू फुले आंबेडकर,**
**कृषी महाविद्यालय आष्टी, जी. बीड**

◆ पान 9 वरून पुढे...

## पीएम केअर...

आणायचं नाही किंवा मी आणू इच्छित नाही. मात्र त्याच बरोबरीने जर का सरकारकडून होणारी मदत ही तुटपुंजी असेल तर ती स्वीकारता येणार नाही. जो काही आकडा आहे तो मान्य करता येणार नाही. या प्रकारचं संकट बऱ्याच वर्षानंतर एवढं भीषण संकट मराठवाड्यावरती कोसळलेलं आहे. जमिनीच्या जमिनी खरडून गेलेल्या आहे. पिकं उद्धवस्त झालेली आहेत. पिकं सडून गेलेली आहेत. घरंदारे, गुरंढोरं, घोळ्यामेंढ्या वाहून गेली आहेत. एकूणच नुसतं शेतीच नाही तर इथल्या शेतकऱ्यांचं आणि आजूबाजूला राहणाऱ्या नागरिकांचं आयुष्य वाहून गेलं आहे. सरकारने जी काही मदत देऊ केलेली आहे ती फारच तुटपुंजी आहे. जर का आपण हिशेब मांडता साधरणतः एकरी साडेतीन ते चार हजार रुपये येतात. आता जे काही झालेलं नुकसान आहे त्याची साफसफाई करायला गेलं तरी खर्च दुपटीने येणार आहे. म्हणजे ही एकप्रकारे शेतक यांची थट्टा सरकार करतंय. पंजाबमध्ये काही दिवसांपूर्वी असंच संकट आलं. आणि तिथल्या 'आप सरकारने जी मदत तिथल्या शेतकऱ्याने दिलेली आहे आणि ती कालबद्ध मर्यादित जाहीर केलेली आहे ती जवळपास हेक्टरी ५० हजार रुपये आहे. पंजाबसारखं राज्य जर एका हेक्टरला ५० हजार रुपये देऊ शकत असेल तर म हाराष्ट्राने द्यायला काहीच हरकत नाही, असे उद्धव ठाकरे म्हणाले. सरसकट कर्जमुक्तीची मागणी आम्ही शेतकऱ्यांच्या वतीने करतो आहोत. मुलांच्या शिक्षणाची सगळी वाट लागली आहे. घरंदारं पुस्तकं, दप्तरं वह्या वाहून गेलेल्या आहेत. आणि त्याच्यात भरीसभर म्हणून पीकविम्याची तर वाईटच परिस्थिती आहे. तो तर एक घोटाळाच आहे. बँकांच्या नोटीसा आता शेतकऱ्यांना यायला लागल्या आहेत. मी सर्व शिवसेनिकांना सांगितलं आहे आणि शेतकऱ्यांनाही सांगतोय की, तुमच्याकडे येणाऱ्या बँकाच्या नोटीसा एकत्र करा आणि आपल्या नजिकच्या शिवसेना शाखेत नेऊन द्या. त्याचं पुढे काय करायचं ते आम्ही बघतो. ज्या शेतकऱ्यांशी मी बोललो त्यांची मागणी आम्ही लावून धरणार आहोत. त्यांचं म्हणणं आहे तुम्ही जशी कर्जमुक्ती केली होती, पण अजूनही शेतकरी ती कर्जमुक्ती विसरलेला नाही. तशीच कर्जमुक्तीची आता गरज आहे. आणि यावेळेला शेतकरी म्हणताहेत, सरकसकट कर्जमुक्त करा, कर्जमाफ करा. मुख्यमंत्री जे वारंवार सांगतात की आम्ही योग्यवेळी करू. म्हणजे तुम्ही निवडणुका आल्यावर जसं २०१९ मध्ये तुम्ही कर्जमाफी जाहीर केली आणि त्याच्यातही एवढ्या अटी-शर्ती टाकल्या होत्या की शेतकरी म्हणाला याच्यापेक्षा मी एकवेळ गळफास लावून घेतो पण तुमची कर्जमाफी नको. शेतकऱ्यांना आज मी सांगतोय की, एकतर आत्महत्येचा विचारही मनात आणू नका आम्ही तुम च्यासोबत आहोत. पण मुख्यमंत्र्यांना विचारतोय की, तुमची योग्य वेळ ही काय, तुम्ही पंचाग बघून सांगणार की कधी योग्य वेळ आहे? मुहूर्त काढून सांगणार आहात का? शेतकऱ्याला कर्जमुक्त केलं पाहिजे. सरकसकट कर्जमुक्तीची मागणी आम्ही शेतकऱ्यांच्या वतीने करतो आहोत. आणि ती जर का सरकारने मागणी मान्य केली नाही तर शेतकऱ्यांच्या बरोबरीने शिवसेना रस्त्यावरती उतरल्याशिवाय राहणार नाही.

◆ पान 9 वरून पुढे...

## महाराष्ट्र लोकसेवा...

धानोरा रोड बीड २८८, शिवाजी विद्यालय, कॅनॉल रोड बीड २८८, सौ. के. एस. के. महाविद्यालय,शिवाजी नगर बीड २४०, संस्कार विद्यालय,नवीन भाजी मंडई बीड २८८, श्री. छत्रपती शाहू माध्यमिक विद्यालय बीड २४० आणि चंपावती प्राथमिक विद्यालय, नगर रोड बीड २४० असे एकूण दोन हजार ४० उमेदवार आहेत. परीक्षा उपकेंद्राच्या परिसरात शांतता तसेच कायदा व सुव्यवस्था अबाधित राखण्यासाठी अपर जिल्हादंडाधिकारी शिवकुमार स्वामी यांनी नागरिक सुरक्षा संहिता २०२३ चे कलम १६३ परीक्षा उपकेंद्राच्या १०० मीटर परिसरात दि. २८ सप्टेंबर २०२५ रोजी कालावधीत परिक्षेच्या वेळेच्या १ तास आगोदर ते परीक्षा संपेपर्यंतच्या कालावधीत परीक्षा केद्राच्या परिसरात व परिक्षेचे साहित्य ठेवलेल्या ठिकाणी मनाई आदेश जारी केले आहेत.

## बीड जिल्ह्यातील ...

जनतेवर आता जे नैसर्गिक संकट आले ते खुप मोठे असून, बाधितांना शासन मदत करणार आहे. तसेच या पुरामुळे अनेक नागरिक बेघर झाले असून, त्यांच्या राहण्याची व जेवणाची सोय करण्यात यावी. शासनामार्फत नुकसानग्रस्त भागातील बाधीत नागरिकांना अन्न-धान्य आणि ५ हजार रुपयांची आर्थिक मदत पोहोचविण्याचे काम सुरू असल्याचे ते यावेळी म्हणाले. शासन नागरिकाच्या पाठीशी खंबिरपणे उभे असून, कोणीही काळजी करू नये. या नैसर्गिक संकटामुळे बाधित नागरिकांना शासन सर्वोतोपरी मदत करणार आहे. येणाऱ्या यंत्रणेमार्फत संकटात असलेल्या नागरिकांना दिलासा देण्याचे काम सुरु आहे. आता बरेच पाणी ओसरले असल्याने उद्यापासून पंचनामे जास्त गतीने सुरु होतील. पावसामुळे झालेल्या नुकसानीचे पंचनामे व्यवस्थित करावेत. पंचनामे पूर्ण झाल्यानंतरच जिल्ह्यातील किती हेक्टर क्षेत्र बाधित झाले आहे व किती नुकसान झाले याची नेमकी आकडेवारी प्राप्त होईल. तसेच ज्या भागात ६५ मिमीपेक्षा जास्त पाऊस झाल्यानंतर त्या भागात अतिवृष्टी झाल्याचा नियम आहे. परंतु ज्या ठिकाणी ६५ मिमीपेक्षा कमी पाऊस झाला, परंतू त्याठिकाणी जास्त नुकसान झाले असल्यास तेथील परिस्थिती बघून बाधीतांना शासन मदत करणार असल्याचे सांगितले. तसेच या नैसर्गिक संकटातून जनतेला बाहेर काढण्यासाठी जे काही करावे लागेल ती मदत शासनमार्फत करण्यात येणार आहे. येणाऱ्या २६ ते ३० सप्टेंबर या कालावधीत अतिवृष्टी होण्याची शक्यता हवामान खात्याने वर्तवली असून, पुन्हा अतिवृष्टी होण्याची शक्यता आहे. त्याकरीता सर्व नागरिकांना काळजी घ्यावी लागेल. यासाठी जिल्हा प्रशासन देखील काम करत आहे. राज्यातील काही भागात पाऊस झाल्याने काही ठिकाणी एअरलिफ्ट करावे लागले, तर काही ठिकाणी एनडीआरएफची टीम आणि आर्मीची टीमने देखील बचाव कार्य केल्याचे त्यांनी यावेळी सांगितले. आजच्या बीड दौऱ्यात उपमुख्यमंत्री श्री. पवार यांनी बीड तालुक्यातील चौसाळा ते पिंपळघाट रोडवरील अनुसया नदीवरील वाहून गेलेल्या पुलाची पाहणी केली. संबंधीत विभागास याठिकाणी नविन

◆ पान 9 वरून पुढे...

पुल तयार करण्याचे निर्देश दिले. यानंतर त्यांनी शिरूर तालुक्यातील खोकरमोहा येथील पाझर तलाव फुटल्याची पाहणी केली. तसेच बीड तालूक्यातील खामगाव आणि नांदुर हवेली गावात सिंदफणा नदीचे पाणी घरात घुसल्याने झालेल्या नुकसाणीची पाहणी केली. याबरोबरच गेवराई तालुक्यातील इटकूर येथे शेतपिकांचे झालेल्या नुकसानीची पाहणी केली. यावेळी आमदार विक्रम काळे, विजयसिंह पंडित, माजी आमदार अमरसिंह पंडित, माजी आमदार संजय दौंड, जिल्हाधिकारी विवेक जॉन्सन, जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी जितीन रहेमान, पोलीस अधिक्षक नवनीत काँवत, उपविभागीय अधिकारी कविता जाधव, बीड तालूका तहसिलदार चंद्रकांत शेळके, शिरुर कासार तालूका तहसिलदार सुरेश घोळवे, गेवराई तालूका तहसिलदार संदिप खोमणे, मंडळ अधिकारी, तलाठी यांच्यासह गावकऱ्यांची उपस्थिती होती.

## धनंजय मुंडेंनी...

यांनी शासन आपली मदत करेल अक्का, पण मुलीच्या लग्नाची काळजी करू नका, ठरलेल्या वेळीच लग्न होईल, त्याच्या संपूर्ण खर्चाची जबाबदारी मी घेतो, असा शब्द देत मोलाचा आधार दिला. रेखाबाई तुकाराम कदम असे संबंधित शेतकरी महिलेचे नाव असून त्यांचे कापसाचे पूर्ण पीक पाण्याने नासून गेले आहे. परळी वैद्यनाथ तालुक्यात गोदावरी नदीला पूर आल्याने आजूबाजूच्या गावात मोठ्या प्रमाणात नुकसान झाले आहे. त्याचबरोबर वाण नदिसह लहान मोठ्या सर्वच नद्यांना आलेल्या पुराने अनेक ठिकाणी शेतीतील माती खरडून गेली आहे, काही ठिकाणी नदीतील दगड गोटे शेतात वाहून आलेत तर अजूनही पिकांमध्ये गुडघाभर पाणी साचलेले आहे. या पार्श्वभूमीवर धनंजय मुंडे यांनी तेलसमुख, ममदापूर, बोरखेड आदी गावांना भेटी देऊन स्थानिकांशी संवाद साधत त्यांना धीर दिला, तसेच प्रशासनास १००% नुकसान भरपाई मिळण्याच्या दृष्टीने योग्य पंचनामे करण्याच्या सूचना केल्या. दरम्यान ममदापूर येथील ३८ वर्षीय तरुण शिवराज कदम हा पुराच्या पाण्यात दि. १६ सप्टेंबर रोजी रात्री कौडगाव हुडा येथील नदीच्या प्रवाहात वाहून गेल्याने मृत झाला होता, त्या तरुणाच्या कुटुंबीयांना आज प्रशासनाच्या वतीने ४ लाख रुपयांची आर्थिक मदत धनंजय मुंडे यांच्या हस्ते सुपूर्द करण्यात आली. सदर रक्कम मयत शिवराज कदम यांच्या पत्नीच्या खात्यात जमा करण्यात आली आहे. यावेळी युवक नेते अजय मुंडे, सूर्यभान मुंडे, राजाभाऊ पौळ, प्रभाकर पौळ, संजय जाधव, नितीन निर्मळ, भागवत कदम, बालासाहेब कदम, वसंत राठोड, भगवान पौळ, जानीमिया कुरेशी, उपविभागीय अधिकारी अरविंद लाटकर, तहसीलदार व्यंकटेश मुंडे यांच्या सह महसूल, कृषी, पोलीस आदी विभागाचे अधिकारी कर्मचारी उपस्थित होते.

## शेतकऱ्यांना मदत...

झाली. जिल्हा मोठा आहे, मी सकाळी सहा वाजता घर सोडून शेतकऱ्यांना भेटण्यासाठी जात आहे. अतिवृष्टीने प्रचंड नुकसान झाले असून शेतकऱ्यांच्या चेहऱ्यावरची चिंता बघवत नाही. पण शेतकऱ्यांनी

◆ पान 9 वरून पुढे...

खचून जावू नये, सरकारकडून मदत मिळवून देण्यासाठी आम्ही प्रयत्न करत आहोत. यासाठी वेळप्रसंगी आम्ही सरकारशी भांडू, पण तुम्हाला मदत मिळवून देण्याचा प्रामाणिक प्रयत्न करत आहोत. जिल्ह्यात नदीकाठी असलेल्या गावात पाणी शिरलेले आहे. शेतातील पिके, जमीन, विहीरी शेतकऱ्यांच्या डोळ्यादेखत वाहून गेल्या. कधी नव्हे इतके पाणी नागरिकांनी पाहिले. जिल्ह्यात जवळपास साडेतीनशे कोटींचे शासकिय मालमत्तेचे नुकसान झालेले आहे. शेतकऱ्यांचे, व्यापाऱ्यांचे किती नुकसान याचा अजून यंत्रणेकडे आकडा आलेला नाही. हे नुकसान कोटीत असणार आहे. शेतकरी या पावसाने उध्वस्त करण्याचे काम केले आहे. सरकारकडून भेटी सुरू आहेत, परंतु अजून ठोस पावले सरकारने उचलले नाहीत. जर ते ठोस पावले उचलत नसतील तर शेतकरी पुढे येवून सरकारविरूध्द उभा राहतील. आम्ही अतिवृष्टीग्रस्तांना न्याय मिळवून देण्यासाठी कुठेही कमी पडणार नाहीत, असेही खा.बजरंग सोनवणे म्हणाले, यावेळी त्यांच्या सोबत राष्ट्रवादीचे नेते राजेसाहेब देशमूख आणि राष्ट्रवादीचे पदाधिकारी उपस्थित होते.

## बीडमध्ये किरकोळ...

लोकांनी यश याला जिल्हा रुग्णालयात दाखल केले परंतु डॉक्टरांनी त्याला मृत घोषित केले. यश हा बीडमधील एका वृत्तपत्राचे उपसंपादक देवेंद्र ढाका यांचा मुलगा आहे. खून प्रकरणाची ही घटना समजल्यानंतर नातेवाईकांनी जिल्हा रुग्णालय तसेच पोलीस अधीक्षक कार्यालयात मोठी गर्दी केली होती. आरोपीला तत्काळ अटक करावे अशी मागणी देखील या नातेवाईकांनी केली. दरम्यान पोलिसांनी सुरज काके नावाच्या एका संशयित आरोपीस ताब्यात घेतले असून या प्रकरणात गुन्हा दाखल करण्याची प्रक्रिया रात्री उशिरापर्यंत सुरू होती. गजबजलेल्यास माने कॉम्प्लेक्स भागात झालेल्या या हत्याकांडाने शहरातील कायदा व सुव्यवस्थेवर गंभीर प्रश्नचिन्ह निर्माण झाले आहे. मध्यवर्ती भागात खुन घडल्याने नागरिकांम ध्ये भीतीचे वातावरण पसरले असुन गुन्हेगारांवर पोलिसांचा धाक उरलेला नाही असे या घटनेवरून स्पष्ट झाले आहे.

## चुकीच्या पध्दतीने....

असून तात्काळ स्थळ पंचनामा करून संबंधित कामाची चौकशी करा आणि नुकसान भरपाई द्या अशी मागणी घाटशीळ पारगाव येथील शेतकरी त्रिंबक खेडकर व इतरांनी केली आहे. घाटशीळ पारगाव येथील सर्व्हे नं. १६ मध्ये नदी काठलगत असलेल्या जमिनींचे पावसामुळे प्रचंड नुकसान झाले आहे. दोन वर्षापुर्वी नदीवरील बंधाऱ्याची उंची वाढवण्याचे काम करण्यात आले होते. परंतू संरक्षक भिंतीची कोणतीही रचना केली गेली नाही. या चुकीमुळे सदर बंधाऱ्याने पाणी अडवल्यामुळे नदीच्या पाण्याचा प्रवाह लगतच्या जमिनीतून वाढू लागला आहे. नदीने पात्र बदलल्याने शेती वीस फुट खोलीने वाहून गेली आहे. पाण्याचा प्रवाह असाच राहिल्यास म ाझ्या व माझ्या कूटूंबियांच्या सव्र्हे नं. १७ मधील शेतीलाही धोका निर्माण झाल्याचे शेतकरी खेडकर यांनी म्हटले आहे.

◆ पान ४ वरून पुढे...

## अतिवृष्टीमुळे नुकसान...

शहरातील डांबरी रस्ते पूर्णपणे खराब झाले असून, त्यांच्या दुरुस्तीची आवश्यकता आहे. याशिवाय, बीड तालुक्यातील पिंपळवाडी गावाजवळील बिंदुसरा नदीचे खोलीकरण व रुंदीकरण करून संरक्षणभिंत उभारावी आणि नदीवर कोल्हापुरी पद्धतीचा बंधारा बांधण्याची गरज असल्याचेही निवेदनात म्हटले आहे.

## आमदार सुरेश....

यावेळी या मदतकार्याला मोठा प्रतिसाद मिळाला यावेळी आमदार सुरेश आण्णा धस मित्र मंडळाचे जिल्हा परिषद सदस्य,पाटोदा नगरपंचायतचे सभापती, नगरसेवक तसेच जनता पार्टीचे पदाधिकारी व कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते. त्यांच्या उपस्थितीमुळे मदतकार्याला अधिक बळ मिळाले. पूरग्रस्तांना मदत करणे हीच खरी समाजसेवा आहे. या संकटाच्या काळात प्रत्येकाने आपली जबाबदारी ओळखली पाहिजे,असे मत आम दार सुरेश आण्णा धस मित्र मंडळाचे व आमदार सुरेश आण्णा धस यांचे स्वीयसहाय्यक सुशील ढोले यांनी सांगण्यात आले. पाटोदा शहरातील पूरग्रस्तांनी या मदतीबद्दल समाधान व्यक्त करत आमदार सुरेश आण्णा धस मित्र मंडळाचे मनःपूर्वक आभार मानले.

## दुष्काळग्रस्त शेतकऱ्यांना...

एसबीआय बँक सदैव शेतकऱ्यांच्या पाठीशी उभा राहून ओल्या दुष्काळाच्या संकटातून बाहेर काढण्यासाठी प्रयत्नशील राहील असे आश्वासन बँक अधिकारी यांनी दिल्यामुळे शेतकऱ्याला एक प्रकारे मोठा दिलासा मिळत आहे काही रक्कम भरून घेऊन व्याजात आणि मुदलात सवलत देऊन कर्ज शेतकऱ्याला द्यावे अशी व्यथा शेतकऱ्यांनी मांडली त्यामुळे शेतकऱ्याला सावरण्याचा प्रयत्न एसबीआय माजलगाव शाखेकडून होत असल्यामुळे एसबीआय कर्मचाऱ्यांचे कौतुक शेतकरी वर्गातून होत आहे

## हिवरसिंगा ग्रामस्थांचे...

प्राजिमा-१९ मलकाचीवाडी पूर्ण वाहतुक बंद होत असल्याने या पाण्याची व्यवस्था करून वाहतुक सुरळीत करणे अत्यावश्यक आहे. सप्टेंबर महिन्यातील अतिवृष्टी मुळे रायमोह महसुली मंडळातील पर्जन्यम ान १२२मी.मी.होऊन खरिप हंगामी कपाशी,तुर,सोयाबिन सह सर्व पीके ६५%पेक्षा अधिक नुकसान झाल्याने अतिवृष्टी जाहिर करून सरसकट नुकसान भरपाई मिळावी.शिवश्री कृषिमंडळाचे अध्यक्ष शिवराम राऊत व सचिव श्री.विश्वाभंर शिंदे यांनी अतिवृष्टी बाधित मंडळातील पिकविमा मंजूर करणे.श्रीनिवास बहुउद्देशिय सेवाभावी संस्थेच्या वतीने मागणी करत उन्हाळी हंगामात हिवरसिंगा नदीचे खोलिकरण सरळीकरण करणे हि बाब अनेक दिवसा पासुन प्रशासनाकडे मागणी करून देखील प्रशासनाकडून सहकार्य होत नसल्याचे निवेदन केले. श्री.विश्वांभर शिंदे,श्री.शिवराम राऊत, भिमराव सानप,श्री.मंगेश सानप,श्री.अनिकेत सानप, दिलीप सानप,बाबुराव कुटे, अशोक शिंदे,गौतम औसरमल, बाळासाहेब दुधाळ, अमोल भालेराव,सतिश दुधाळ, संतोष गायकवाड,राजू शेख,बळिराम शिंदे,सदाशिव शिंदे,समिर शेख,लिंबाजी दुधाळ सह शेतकरी,ग्रामस्थ यांनी विविध मागण्यांचे निवेदन केले. सर्व बाबतीत ना.अजित दादांनी सर्व निवेदीत मागण्या सकारात्मक पणे घेत वेळोवेळी आठवण करून प्रशासनाला सुचित केले.

## महाराष्ट्रात ओला....

लाखो विद्यार्थ्यांच्या शिक्षणाचा प्रश्न निर्माण झाला आहे. महाराष्ट्रातील दुष्काळ परिस्थिती लक्षात घेता विद्यार्थ्यांचे शैक्षणिक वर्षे २०२५-२६ चे प्रवेश शुल्क, परीक्षा शुल्क व सर्वच प्रकारचे शैक्षणिक शुल्क माफ करण्यात यावे अशी मागणी स्टुडंट्स फेडरेशन ऑफ इंडियाच्या वतीने करण्यात येत आहे. राज्यात अनेक भागात अद्यापही मदत पोहचली नाही अशा अनेक भागात पूरपरिस्थिती आहे. पिकांचे मोठे नुकसान झाले आहे तर अनेक शेतकऱ्यांची शेती वाहून गेली आहे. अशा परिस्थिती मध्ये शेतकरी आर्थिक संकटात सापडला आहे. त्याच्यापुढे अनेक प्रश्न निर्माण झाले आहेत त्याम ध्ये मुलाबाळांच्या शिक्षणाचा प्रश्न निर्माण झाला आहे अशा परिस्थितीमध्ये शासनाने महाराष्ट्रामध्ये ओला दुष्काळ जाहीर करून शेतकऱ्यांना भरभरून मदत करावी तसेच सरसकट महाराष्ट्रामधील विद्यार्थ्यांचे प्रवेश शुल्क, परीक्षा शुल्क व इतर सर्व प्रकारचे शैक्षणिक शुल्क माफ करावे, शेतकऱ्यांचे

◆ पान ४ वरून पुढे...

सरसकट पंचनामे करून हेक्टरी ₹५०,०००/- मदत शासनाने तात्काळ द्यावी, पूरग्रस्त भागामध्ये ज्यांच्या घराचे व इतर नुकसान झाले आहे त्यांना आर्थिक मदत करावी, अतिवृष्टी व पूर परिस्थितीमध्ये वाहून गेलेल्या व मृत्युमुखी पडलेल्या नागरिकांच्या कुटुंबीयांना ५० लाख रुपये आर्थिक मदत व कुटुंबातील एका सदस्याला शासकीय सेवेमध्ये नोकरी द्या या सर्व मागण्या वडवणी तहसील कार्यालयाचे तहसीलदार यांच्यामार्फत महाराष्ट्र राज्याचे मुख्यमंत्री यांना पाठवण्यात आलेल्या निवेदनाद्वारे स्टुडंट्स फेडरेशन ऑफ इंडिया च्या वतीने करण्यात आल्या आहेत. यावेळी एसएफआयचे राज्य सहसचिव लहू खारगे, जोतिराम कलेढोन, तालुकाध्यक्ष करण साळवे, अभिषेक अडागळे पदाधिकारी व विद्यार्थी उपस्थित होते.

## ओला दुष्काळ...

पशुधन दगावले आहे. अनेकांची गोठे, घर वाहून गेली आहेत. अतिवृष्टीमुळे शेतकरी हतबल झाला असून काय करावे याचा विचारही त्याला सुचत नाही मुलांचे शिक्षण संसाराचा गाडा मुलीचे लग्न असे एक ना अनेक प्रश्न समोर असताना अतिवृष्टीने दिलेला फटका त्यांच्या मानेला लागला असून जीव सोडून देण्याची वेळ या शेतकऱ्यांवर आली आहे. घरात काही नाही, शेतात पीक नाही, गोठ्यात पशुधन नाही, जवळ पैसा नाही अशा अवस्थेत हातात झालेला शेतकरी आता मायबाप असलेल्या सरकारकडेच डोळे लावून बसला आहे या वेळेतच शेतकऱ्याला मदत झाली नाही तर शेतकरी उध्वस्त झाल्याशिवाय राहणार नाही त्यामुळे शेतकरी वाचला तर देश वाचन यासाठी सरकारने एक पाऊल पुढे येऊन शेतीचे पंचनामे करून ओला दुष्काळ जाहीर करावा अशी मागणी राज्याचे उपमुख्यमंत्री अजित पवार यांना निवेदन देऊन शिवसंग्राम शेतकरी आघाडीच्या वतीने जिल्हाध्यक्ष राजेंद्र आमटे करण्यात आली. दरम्यान पालकमंत्री ना.अजित पवार यांनी शेतकऱ्यांना जास्तीत जास्त मदत देण्यात येईल असे आश्वासन यावेळी निवेदनकर्त्यांना दिले.

## पुरग्रस्त शेतकऱ्यांसाठी....

असल्याचे शिवसेना जिल्हाप्रमुख सचिन मुळूक यांनी सांगितले. नवरात्रात लाडक्या बहिणींना स्वतःची कला आणि कौशल्य मांडण्याची संधी मिळावी या हेतूने २४ ते २९ सप्टेंबर दरम्यान स्वयंभू नारायणी रांगोळी स्पर्धा, स्त्रीशक्ती मेहंदी स्पर्धा आणि नवरंग नृत्य रील स्पर्धा आयोजित करण्यात आल्या होत्या. या स्पर्धांना महिलांकडून चांगला प्रतिसाद मिळणार अशी अपेक्षा होती. परंतु अचानक झालेल्या अतिवृष्टीमुळे मराठवाड्यासह बीड जिल्ह्यात शेतकरी मोठ्या संकटात सापडले. शेतात पाणी साचल्याने कापूस, सोयाबीन, ज्वारीसारखी प्रमुख पिके नष्ट झाली असून शेतकरी आर्थिकदृष्ट्या हवालदिल झाले आहेत. अनेकांचे संसार उघड्यावर पडले आहेत. या दुःखद परिस्थितीत सण-उत्सव साजरा करण्याऐवजी शेतकऱ्यांच्या पाठीशी उभे राहणे ही खरी सामाजिक बांधिलकी आहे. त्यामुळे स्पर्धा रद्द करून त्यासाठीचा निधी मदतीसाठी देण्यात येणार आहे. दरम्यान शिवसेना नेहमीच संकट काळात शेतकऱ्यांच्या सोबत उभी राहिली आहे. नवरात्रात महिलांसाठी आनंदाचा माहोल निर्माण करण्याची इच्छा होती; मात्र सध्या शेतकऱ्यांचे अश्रू पुसणे महत्वाचे आहे. यामुळे स्पर्धा रद्द करून सर्व निधी जिल्हाधिकाऱ्यांमार्फत शेतकऱ्यांच्या मदतीसाठी देण्यात येणार आहे. शिवसेना पक्षाचे मुख्य नेते आणि राज्याचे उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे हे शेतकऱ्यांच्या प्रश्नांकडे कायम गांभीर्याने पाहतात. त्यांचे मार्गदर्शन आणि नेतृत्व लक्षात घेऊन जिल्ह्यातील शेतकऱ्यांना मदतीचा हात देण्याचा निर्णय घेण्यात आला असल्याचे जिल्हाप्रमुख सचिन मुळूक म्हणाले.

## महिला डॉक्टर्स...

आहे. घरांचे नुकसान, अन्न-पाण्याची टंचाई, वीज व संपर्क व्यवस्थेवर परिणाम अशा अडचणींना नागरिक तोंड देत आहेत. अशा कठीण परिस्थितीत आरोग्याच्या समस्या अधिकच गंभीर होऊ शकतात. याच पार्श्वभूमीवर एक अत्यंत स्तुत्य उपक्रम म्हणून महिला डॉक्टरांच्या चम ूकडून मोफत तपासणी व उपचार सेवा पूरग्रस्त नागरिकांसाठी सुरू करण्यात आली आहे. या उपक्रमामध्ये महिला डॉक्टरांनी स्वखर्चाने औषधे आणून, विविध पूरग्रस्त भागात जाऊन महिलांसह वृद्ध, लहान मुले आणि गर्भवती मातांची विशेष काळजी घेतली. महिलांच्या आरोग्यविषयक समस्या, मासिक पाळीतील अडचणी, त्वचारोग, संसर्गजन्य आजार, थकवा, ताप, सर्दी अशा अनेक तक्रारींवर उपचार देण्यात आले.

Daily Marathwada Patra Owner, Printer, published and Editor Dattatray Sakharam Narnale has Printed in Gugladevi, Printers Subhash Road, Malives, Kabad Galli, Beed (Rural) City, Beed Beed 431122 (Maharashtra). Office of Dainik Marathwada Patra Subhash road, Malives, Kabad Galli, Beed Tq- Beed Dist- Beed pin 431122 (Maharashtra) Mo. 9822152955, E-mail- dailymarathwadapatra2021@gmail.com, epaper: https://marathwadapatra.com, Eportal-https://marathwadapatra.com
हे पत्र प्रकाशक मुद्रक व मालक दत्तात्रय सखाराम नरनाळे यांनी गुगळादेवी प्रिंटर्स, सुभाष रोड, माळीवेस, कबाड गल्ली, बीड, ता.जि. बीड - ४३११२२ (महाराष्ट्र) येथे छापून कार्यालय दैनिक मराठवाडा पत्र सुभाष रोड, माळीवेस, कबाडगल्ली, बीड ता. जि. बीड - ४३११२२ (महाराष्ट्र) येथे प्रकाशित केले. मोबा. ९८२२१५२९५५ संपादक - दत्तात्रय सखाराम नरनाळे, E-mail-marathwadapatra@gmail.com, epaper: https://marathwadapatra.com, Eportal-https://marathwadapatra.com

# नुकसानग्रस्तना तात्काळ चार हजाराची धान्य देण्याची उपमुख्यमंत्री अजितदादाची ओला दुष्काळ पाहणी दरम्यान घोषणा

**बीड । प्रतिनिधी**

बीडसह जिल्ह्यात अनेक ठिकाणी अतिवृष्टीमुळे शेतकऱ्यांचे अतोनात नुकसान झाले आहे. पूरग्रस्त शेतकऱ्यांच्या पाठीशी महायुती सरकार खंबीरपणे उभे आहे. ज्यांच्या घरात पाणी शिरले अशा नुकसानग्रस्तांना आर्थिक मदत व धान्य देण्याचे शासनाने ठरवले आहे, अशी माहिती उपमुख्यमंत्री तथा जिल्ह्याचे पालकमंत्री अजितदादा पवार यांनी दिली. बीड तालुक्यातील हिंगणी खुर्द येथे गुरुवारी (दि.२५) सकाळी ७ वाजता पूरस्थितीची पाहणी करून अजितदादा पवार यांनी शेतकऱ्यांशी संवाद



साधला. राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे बीड विधानसभा अध्यक्ष डॉ.योगेश क्षीरसागर यांनी मागील दोन दिवसांपासून पूरग्रस्त भागाला भेट देऊन शेतकऱ्यांच्या व्यथा ऐकल्या होत्या. त्यानंतर त्यांनी सविस्तर माहिती अजितदादांकडे सादर केली होती. त्याअनुषंगाने झालेल्या पाहणी दौऱ्यात त्यांनी शासकीय यंत्रणेला आवश्यक त्या सूचना दिल्या. तसेच, हिंगणी खुर्द गावाचे पुनर्वसन करण्यासंदर्भात चर्चा झाली असून कार्यवाही करण्याचे अजितदादांनी प्रशासनाला निर्देश दिले. यावेळी आमदार विक्रम काळे, विजयसिंह पंडित, राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे जिल्हाध्यक्ष ड.राजेश्वर चव्हाण, बीड विधानसभा अध्यक्ष डॉ.योगेश क्षीरसागर, ज्येष्ठ नेते रमेश आडसकर, युवक जिल्हाध्यक्ष बळीराम गवते, बीडचे तालुकाध्यक्ष ड.राजेंद्र राऊत, भाजपचे ज्येष्ठ नेते विजय पालसिंगणकर, सरपंच संतोष तांदळे यांच्यासह विविध पक्षाचे पदाधिकारी, जिल्हाधिकारी विवेक जॉन्सन, पोलीस अधीक्षक नवनीत कावत, मुख्य कार्यकारी अधिकारी जितिन रहमान यांच्यासह महसूल, जिल्हा परिषद, कृषी विभागाचे अधिकारी, कर्मचारी उपस्थित होते.

### बीड मतदारसंघातील पूरग्रस्त भागात दौरा

**बीड तालुक्यातील पिंपळगाव घाट, हिंगणी खुर्द, चौसाळा (वाढवणा पूल) तसेच शिरूर कासार तालुक्यातील खोकरमोहा, येवलवाडी येथे अजितदादा पवार यांनी शेतकऱ्यांशी संवाद साधून नुकसानीची पाहणी केली. खोकरमोहातील फुटलेल्या तलावाची पाहणी केली व झालेल्या नुकसानीचा आढावा घेतला. त्यानंतर जिल्हा परिषद माध्यमिक शाळेला भेट देऊन शाळेची पाहणी केली. रायमोहा व येवलवाडी परिसरात रस्त्यात खचलेला पूल, अतिवृष्टीमुळे शेतकऱ्यांच्या शेतीचं झालेलं अतोनात नुकसान व वाहून गेलेल्या पुलाची प्रत्यक्ष पाहणी केली. यानंतर दगडवाडी व हिवरसिंगा येथील ग्रामस्थांची भेट घेऊन त्यांच्याशी संवाद साधला. पुढे बीडमध्ये प्रशासनासोबत चर्चा करून अजितदादा पवार यांनी आहेर चिंचोली, खामगाव, नांदूर हवेली या गावांना भेटी दिल्या.**

## काँग्रेस नेते गणेश बजगुडे पाटील शेतकऱ्यांच्या बांधावर



**बीड । प्रतिनिधी**

तालुक्यासह जिल्हाभरात परतीच्या पावसाने प्रचंड धुमाकुळ घातलेला असताना सरकार मात्र पंचनाम्याच्या नावावर वेळ काढूपना करत असुन सर्वच शेतकऱ्यांचे प्रचंड मोठ्या प्रमाणात नुकसान झालेले आहे. शेतकरी अतिशय हवालदिल झालेला असताना त्यांना आधार देण्यासाठी काँग्रेस नेते गणेश दादा बजगुडे पाटील हे शेतकऱ्यांच्या पाठीशी उभा राहून शेतकऱ्यांना तत्काळ सरसकट हेक्टरी पन्नास हजार रुपये मदत आठ दिवसात देण्यात यावे नसता काँग्रेस पक्ष आणि शिवक्रांती संघटनेच्या वतीने तीव्र आंदोलन छेडण्याचा इशारा गणेश दादा बजगुडे पाटील यांनी दिला आहे. काल बीड तालुक्यातील अनेक नुकसान ग्रस्त शेतकऱ्यांना भेटी देऊन त्यांच्या पाठीशी खासदार रजनीताई पाटील परिवार व काँग्रेस पक्ष खंबीरपने उभे असुन नुकसान ग्रस्त शेतकऱ्यांन कसल्याही प्रकारची अडचण आल्यास किंवा मदत लागल्यास आमच्याशी संपर्क करावा असे ही ते म्हणाले.

## दिवस उगवताच बीडचे पालकमंत्री व महाराष्ट्राचे उपमुख्यमंत्री अजित दादा पवार चौसाळ्यात दाखल, पूर परिस्थितीमुळे नुकसान झालेल्या पिकाची केली पाहणी, हिंगणी बुद्रुक येथील शेतकऱ्यांच्या व ग्रामस्थांच्या घेतल्या व्यथा जाणून

**चौसाळा । प्रतिनिधी**

मागील आठवड्यात झालेल्या ढगफुटी सदृश्य पावसामुळे शेतकऱ्यांची अतोनात नुकसान झाले आहे चौसाळा येथील पिंपळगाव रस्त्यावरील पूल वाहून गेला त्यामुळे वाढवणा पिंपळगाव रुई गव्हाण माळेवाडी मानेवाडी या पाच गावांचा संपर्क तुटला शेतकऱ्यांची पिके नदी लेखक असलेली जनावरांची गोठे त्यात वाहून गेलेली जनावरे पिके यामुळे अतोनात नुकसान



झाले आहे या नुकसानीची पूर्ण पाहणी करण्यासाठी महाराष्ट्र राज्याचे उपमुख्यमंत्री व बीड जिल्ह्याचे पालकमंत्री अजितदादा पवार यांनी सकाळी सहा वाजता चौसाळा येथे आगमन केले चौसाळा येथील पाहणी दौरा पूर्ण झाल्यानंतर हिंगणी खुर्द या ठिकाणी जाऊन शेतकऱ्यांच्या पीडितांच्या व्यथा जाणून घेतल्या यावेळी एका महिलेने सायबर वाल्याकडून कशी फसवणूक आली झाली आहे याचे सविस्तर आपली फसवणूक झाली आहे हे दादांना सांगितले. यावेळी आमदार विजयसिंह पंडित राष्ट्रवादीचे नेते रमेश रावजी आडसकर डॉक्टर योगेश क्षीरसागर जिल्हाधिकारी विवेक जॉन्सन जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी रहमान पोलीस अधीक्षक नवनीत कावत नेकनूर पोलीस स्टेशनचे सहाय्यक पोलीस निरीक्षक चंद्रकांत गोसावी तहसीलदार चंद्रकांत शेळके चौसाळा प्राथमिक आरोग्य केंद्राचे डॉक्टर वैभव मोटे ग्रामसेवक बाबासाहेब चव्हाण मंडळ अधिकारी जायभाय सर्व सध्याचे तलाठी सर्व गावाचे ग्रामसेवक उपस्थित होते पोलीस विभागामार्फत चोख बंदोबस्त ठेवण्यात आला होता.

## शेतकऱ्यांना तातडीने आर्थिक हेक्टरी ५० हजार रुपये मदत करा : नवनाथ शिराळे पाटील

**बीड । प्रतिनिधी**

सध्या महाराष्ट्रामध्ये सर्वत्र मुसळधार पाऊस झाल्यामुळे शेतकऱ्यांना याचा फार मोठा फटका बसला असून याच पार्श्वभूमीवर बीड जिल्ह्यामध्ये काही तालुक्यात ढगफुटी होऊन शेतकऱ्याच्या जमिनी महापुराने वाहून गेल्या तसेच पिकामध्ये पाणी गेले हाताचे पीक वाया गेले काही शेतकऱ्यांचे पशुधन पाण्यामध्ये वाहून गेले बैल महेश शेळी गाय इत्यादी पाळीव पशुधन शेतकऱ्याचे पाण्यामध्ये पुरामध्ये वाहून गेले या सर्व बाबीमुळे शेतकरी मोठा आर्थिक संकटात



सापडला असून शेतकऱ्यावर फार मोठे आभाळ फाटले आहे आता या सर्व संकटातून शेतकऱ्यांना वाचवण्यासाठी महाराष्ट्र राज्याचे कर्तव्यदक्ष मुख्यमंत्री देवेंद्रजी फडणवीस उर्फ देवा भाऊ यांनी सर्व शेतकऱ्यांना तातडीने नुकसान भरपाई द्यावी आणि सर्व शेतकऱ्यांचे सरसकट पंचनामे प्रशासनाच्या वतीने करून त्यांना तात्काळ हेक्टरी ५० हजार रुपये आर्थिक मदत मिळून द्यावी अशी अपेक्षा सध्या महाराष्ट्रातील तसेच बीड जिल्ह्यातील तमाम शेतकरी बांधवांमधून व्यक्त होत आहे असे प्रसिद्धी पत्रकाच्या माध्यमातून भारतीय जनता पार्टीचे बीड जिल्हा उपाध्यक्ष तथा शेतकरी नवनाथ अण्णा शिराळे पाटील यांनी म्हटले आहे तसेच काही शेतकऱ्यांच्या घरांमध्ये पाणी जाऊन घराची पडझड झाली असून अनेक घरे पाण्याच्या पुराने वाहून गेले आहेत तसेच घरातील अन्नधान्य देखील पाण्यामध्ये वाहून गेले आता खायचा प्रश्न देखील शेतकऱ्यांना पडला आहे त्याच्यामुळे शेतकऱ्यांना अन्नपुरवठा माध्यमाच्या माध्यमातून सरसकट गहू डाळ साखर तेल मीठ यासारखे अन्नधान्य पदार्थ देखील शासनाने तातडीने येणाऱ्या दिवाळीसाठी दसऱ्यासाठी सर्व शेतकऱ्यांना मोफत द्यावेत कुठल्याही शेतकऱ्याकडून त्याच्या बदल्यात पैसे घेऊ नये तसेच ज्या शेतकऱ्यांनी पीक विमा भरला आहे

### सडलेल्या पिकाचे पंचनामे करण्याऐवजी शेतकऱ्यांना सरसकट मदत करा

**बीड । प्रतिनिधी**

जिल्ह्यातील आष्टी, पाटोदा, शिरूर, बीड, गेवराई, माजलगाव केज, परळी, धारूर, अंबाजोगाई तालुक्यात गेल्या महिन्यापासून पावसाने थैमान घातले असून अनेक जनावरांचा मृत्यू झाला असून अनेक जनावरे पुरात वाहून गेले आहेत. तसेच शेतीचेही मोठे प्रमाणावर नुकसान झाले असून सर्व पिके सडली आहेत. सडलेल्या पिकांचे पंचनामे करण्यापेक्षा सरसकट शेतकर्यांना मदत करावी अशी मागणी बीड जिल्हा विकास परिषदेणे निवेदनाद्वारे पालकमंत्री अजित दादा पवार यांच्याकडे केली आहे.

## गोदावरी व सिंधफाना, कुंडलीका नदीकाठच्या पुराने बाधीत झालेलं क्षेत्र कायमस्वरुपी शासनाने संपादित करावे : भाई थावरे

### शासनाने ओला दुष्काळ जाहिर करावा ; दि ०७ ऑक्टोबर रोजी तहसील कार्यालयावर शेतकऱ्यांचा आक्रोश मोर्चा काढणार

**माजलगाव । प्रतिनिधी**

माजलगाव विधानसभा मतदारसंघातील गोदावरी, सिंधफाना व कुंडलीका नदीकाठच्या शेतकऱ्यांच्या शेतात पुराचे पाणी घुसुन पिकांचे मोठ्या प्रमाणावर नुकसान होत असल्याने शासनाने नदीकाठच्या बाधीत होणारे क्षेत्र कायमस्वरुपी संपादीत करण्यात यावे,बीड जिल्ह्यात ओला दुष्काळ जाहीर करावा,बाधीत शेतकऱ्यांना हेक्टरी ५० हाजार रुपायांची मदत जाहीर करण्याच्या मागणीसाठी शेतकरी संघर्ष समितीच्या वतीने दि ०७ ऑक्टोबर रोजी तहसील कार्यालयावर शेतकऱ्यांचा आक्रोश मोर्चा काढण्यात येणार असल्याचे भाई गंगाभिषण थावरे यांनी घेतलेल्या पत्रकार परिषदेत सांगितले.

यासंदर्भात भाई गंगाभिषण



थावरे यांनी त्यांच्या संपर्क कार्यालयात दि २५ सप्टेंबर गुरुवार रोजी दुपारी १:०० वाजता घेतलेल्या पत्रकार परिषदेत सांगितले की,बीड जिल्ह्यात अतिवृष्टीमुळे,गोदावरी,सिंधफना,कुंडलीका नदीपाकाठच्या गावात पुराच्या पाण्यामुळे शेतकऱ्यांच्या शेतात पाणी घुसून पिकांचे मोठे प्रमाणावर नुकसान झाल्याने,शासनाने नदीकाठचे होणारे बाधित क्षेत्र कायमस्वरुपी संपादीत करुन, संबंधित शेतकऱ्यांना मावेजा देण्यात यावा, शासनाने बीड जिल्ह्यात ओला दुष्काळ जाहीर करावा,या मागणीसाठी शेतकरी संघर्ष समितीच्या वतीने दि ०७ ऑक्टोबर मंगळवार रोजी शेतकऱ्यांचा माजलगाव तहसील कार्यालयावर भव्य आक्रोश मोर्चा काढण्यात येणार आहे,तरी या आक्रोश मोर्चात बाधित शेतकऱ्यांनी मोठ्या संख्येने उपस्थित राहावे असे आवाहन भाई गंगाभिषण थावरे यांनी पत्रकार परिषदेत केलें आहे.

### अतिवृष्टीग्रस्त भागाच्या दौऱ्यात शिवसेना पक्षप्रमुख उद्धवजी ठाकरे यांच्या हस्ते...

## माजी जिल्हाप्रमुख परमेश्वर सातपुते यांच्याकडून पिंपळवाडी येथील मयत मुलाच्या कुटुंबास ५१ हजारांची रोख मदत

**बीड । प्रतिनिधी**

शिवसेना पक्षप्रमुख तथा महाराष्ट्राचे माजी मुख्यमंत्री सन्माननीय उद्धवजी ठाकरे साहेब मराठवाड्यातील अतिवृष्टीग्रस्त भागाच्या पाहणी दौऱ्यावर आले असता त्यांनी बीड जिल्ह्यातील मौजे कुर्ला परिसरात शेतकऱ्यांच्या बांधावर जाऊन शेतकरी बांधवांशी संवाद साधत नुकसानीचा आढावा घेतला. ओला दुष्काळ जाहीर करून सरसकट हेक्टरी ५० हजार रुपयांचे अनुदान शेतकऱ्यांना द्यावे अशी सरकारकडे मागणी केली.

नसता सर्व शेतकऱ्यांसह आम्ही रस्त्यावरती उतरू असा इशारा देखील दिला. या दरम्यान, मौजे पिंपळवाडी येथे आलेल्या भीषण पुरामुळे चि. अदित्य उत्तम कळसाणे (वय १०) याचा दुर्दैवी मृत्यू झाला. या दुःखद प्रसंगी उद्धव ठाकरे साहेबांच्या हस्ते व जिल्हा संपर्क नेते अंबादासजी दानवे यांच्या मार्गदर्शनाखाली माजी जिल्हाप्रमुख परमेश्वर सातपुते सर यांनी मयताच्या कुटुंबीयांना रोख ५१ हजार रुपयांची मदत केली.

याप्रसंगी उद्धवजी ठाकरे साहेब म्हणाले. लहान वयात अदित्यसारखा चिमुकला देवाघरी जाणं ही अत्यंत दुःखद घटना आहे. कळसाणे कुटुंबाच्या या दुःखात आम्ही मनापासून सहभागी आहोत. शिवसेना परिवार सदैव संकटग्रस्तांच्या पाठीशी उभा राहील. या प्रसंगी शिवसेना नेते संजयजी राऊत, मा. खासदार चंद्रकांतजी खैरे, आमदार मिलिंदजी नार्वेकर, आमदार संदीप भैय्या क्षीरसागर, माजी आमदार शेख सलीम भाई, सहकारी जिल्हाप्रमुख गणेश भाऊ वरेकर, जिल्हाप्रमुख उल्हास गिराम, राष्ट्रवादीचे जिल्हाध्यक्ष राजेंद्रजी मस्के यांच्यासह शिवसेनेचे उपजिल्हाप्रमुख, तालुका प्रमुख, विधानसभा प्रमुख, उपतालुकाप्रमुख, शाखाप्रमुख, विभाग प्रमुख सह शिवसेना, युवा सेना, महिला आघाडीचे सर्व आजी-माजी पदाधिकारी व कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते.





*जवळा माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालय जवळा म्हाळस ता.जि.बीड सन २०१४-१५ च्या १० वी बॅच ची विद्यार्थिनी कुमारी गवळी निशा प्रभाकर हिचीविद्युत सहायक म्हणून फलटण जि.सातारा या ठिकाणी नियुक्ती झाली, तिला तिच्या पुढील कारकिर्दीसाठी शुभेच्छा देतांना शाळेचे प्राचार्य श्री. गाडे सर, वरिष्ठ लिपिक श्री.शेख सर, पर्यवेक्षक श्री.डोळे सर, श्री.टेकाळे सर व सर्व कर्मचारी वृंद जवळा माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालय जवळा म्हा. ता.जि.बीड.*

## देसूर येथील शेतकरी महिलेचे पीक वाहून गेले, विहीर बुजली - अतिवृष्टीत मोठा फटका

**आष्टी । प्रतिनिधी**

देसूर, ता. आष्टी, जि. बीड येथील सुवर्णा दत्तु भवर या शेतकरी महिलेच्या शेतीवर गेल्या काही दिवसांपासून सुरू असलेल्या अतिवृष्टीमुळे मोठा फटका बसला आहे. सर्वे नंबर २१/८ मधील त्यांच्या जमिनीत डोंगराकडून आलेल्या नाल्यांचा पाण्याचा ओघ फुटून त्यांच्या मालकी हक्काच्या जमिनीत प्रवेश केला. यामुळे त्यांच्या विहिरीवर मोठा परिणाम झाला असून, विहीर पूर्णपणे बुजली आहे. पाइपलाइनसह तूर पीक पूर्णपणे वाहून गेले असून, नाले फुटल्यामुळे जमिनीत आलेल्या मटेरियलमुळे विहीर अधिक नुकसानग्रस्त झाली आहे. सुवर्णा भवर यांनी सांगितले की, या अतिवृष्टीमुळे त्यांना शेतातील मोठ्या प्रमाणावर आर्थिक नुकसान सहन करावे लागले आहे.

## चौंकशीची जाहीर नोटीस

एस. आर. एन. क्रमांक: BED/01819/18/24

फेरफार अहवाल / अर्ज क्रमांक: .........

सार्वजनिक न्यासाचे नाव व नोंदणी क्रमांक **श्री बिरोबा मंदिर पाटण ता. आष्टी जि.बीड बाबत**

न्यासाचा पत्ता :- **श्री बिरोबा मंदिर पाटण सांगवी पाटण खिलाड टीक्यू. अष्टी डिस्ट्रिक्ट. बीड, सांगवी पाटण खिलाड टीक्यू. अष्टी डिस्ट्रिक्ट. बीड, बीड, आष्टी, सांगवी पाटण**

**अर्जदार:- दत्तात्रय नानाभाऊ जगताप,**

सर्व संबंधित लोकांस जाहीर नोटीशीने कळविण्यात येते की, सहायक धर्मादाय आयुक्त, बीड, हे वर नमूद केलेला अर्ज यासंबंधी महाराष्ट्र सार्वजनिक विश्वस्त व्यवस्था अधिनियम, १९५० चे कलम १९ अन्वये खालील मुद्द्यांवर चौकशी करणार आहेत:- (१) वर नमूद केलेला न्यास अस्तित्वात आहे काय? आणि सदरचा न्यास सार्वजनिक स्वरूपाचा आहे काय?

(२) खाली निर्दिष्ट केलेली मिळकत सदर न्यासाच्या मालकीची आहे काय?

**जंगम मिळकत (वर्णन)**

| अ.क्र. | तपशील | अंदाजे मूल्य |
|---|---|---|
| 1 | PITALI SAMAI-1 | 1000.00 |
| 2 | PITALI GHANTA 1 | 2000.00 |

**(अ) जंगम मिळकत : रोख रु. ३०००/- मात्र, (अक्षरी रुपये तीन हजार मात्र फक्त)**

| अ. क्र. | शहर किंवा गांव | सी.एस किंवा महानगरपालिका किंवा सर्वेक्षण क्र. | क्षेत्र | मूल्यांकन | मुदत / कालावधी किंवा स्वरूप | अंदाजे मूल्य |
|---|---|---|---|---|---|---|
| 1 | PATHAN TQ ASHTI DIST BEED | 86 | 1= 00H./R. | 1= 00H./R. | TEMPEL LAND | 1250000.00 |
| 2 | PATHAN TQ ASHTI DIST BEED | 86 | 12X12= 144 SFT AND 50X30 =1500 SFT | 1644 SFT | TEMPEL AND SABHA MANDAP | 550000.00 |

**(ब) स्थावर मिळकत: रोख रु. १८०००००/- मात्र,**
**(अक्षरी रुपये अठरा लाख मात्र फक्त)**


सदरच्या चौकशी प्रकरणामध्ये कोणास काही हरकत घ्यावयाची असेल अगर पुरावा देणेचा असेल त्यांनी त्यांची लेखी कैफियत ही नोटीस प्रसिद्ध झाल्या तारखेपासून तीस दिवसांचे आत या कार्यालयाचे वरील पत्यावर मिळेल अशा रितीने पाठवावी. त्यानंतर आलेल्या कैफियतींचा विचार केला जाणार नाही. तसेच मुदतीत कैफियत न आल्यास कोणास काही सांगावयाचे नाही असे समजून चौकशी पुरी केली जाईल व अर्जाचे निकालाबाबत योग्य ते आदेश दिले जातील.

ही नोटीस माझे सहीनिशी व या कार्यालयाचे शिक्यानिशी आज दिनांक २५-०९-२०२५ रोजी दिली

शिक्का

**(स्वाक्षरीत)**
**अधिक्षक**
**सार्वजनिक न्यास नोंदणी कार्यालय बीड**

दैनिक **मराठवाडा पत्र**
महाराष्ट्राचा बुलंद आवाज
• छत्रपती संभाजीनगर • जालना • बीड • परभणी • लातूर • नांदेड • धाराशिव • हिंगोली • अहिल्यानगर
● संपादक : दत्तात्रय सखाराम नरनाळे ● जिल्हा विशेष ● शुक्रवार, दि. २६ सप्टेंबर २०२५ ● पान ४



*आपत्तीग्रस्त शेतकऱ्यांसाठी मानवतेच्या दृष्टिकोनातून एक मदतीचा हात म्हणून बीड जिल्ह्यातील ग्राम महसूल अधिकारी व मंडळ अधिकारी आपले एक दिवसाचे वेतन मुखमंत्री सहाय्यता निधीत देण्यासंदर्भात अजित दादा पवार उपमुख्यमंत्री व जिल्हाधिकारी साहेबांना यांना निवेदन देण्यात आले. यावेळी जिल्हाध्यक्ष पी एस आंधळे, उपाध्यक्ष बंडू आगलावे, कार्याध्यक्ष अनिल तांदळे, अंगद काशीद, शब्बीर पठाण,सचिन एरंडे, कुलकर्णी उपस्थित होते.*

# अतिवृष्टीमुळे नुकसान झालेल्या तलाव, बंधारे, रस्ते आणि पुलांच्या तातडीने दुरुस्तीचे निर्देश

**बीड । प्रतिनिधी**

जिल्ह्यातील अतिवृष्टीमुळे नुकसान झालेल्या तलाव, बंधारे, रस्ते आणि पुलांच्या तातडीने दुरुस्तीचे निर्देश उपमुख्यमंत्री तथा पालकमंत्री अजितदादा पवार यांनी जिल्हा प्रशासनाला दिले आहेत. यासंदर्भात राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे बीड विधानसभा अध्यक्ष डॉ.योगेश क्षीरसागर यांनी गुरुवारी (दि.२५) निवेदन सादर केले होते. या निवेदनाची तात्काळ दखल घेत पालकमंत्र्यांनी अधिकाऱ्यांना जागेवरच सूचना दिल्या.

निवेदनात म्हटले की, जिल्ह्यात २०० हून अधिक मध्यम व लघुप्रकल्प असून, त्यांची डागडुजी करणे अत्यंत आवश्यक आहे. अतिवृष्टीच्या परिस्थितीत पूराचा गंभीर धोका निर्माण होऊ शकतो, त्यामुळे प्रकल्पांच्या सांडव्यांची दुरुस्ती व इतर कामांचा आढावा घेऊन त्वरित उपाययोजना व्हाव्यात. मुसळधार पावसामुळे अनेक रस्ते व पूल वाहून गेले असून, त्यांची तातडीने दुरुस्ती आवश्यक आहे. काही गावांमध्ये वीजेचे खांब कोसळून तारा तुटल्या असल्याने वीजपुरवठा खंडित झाला आहे. त्यामुळे झालेल्या नुकसानीचा आढावा घेऊन संबंधित विभागांनी दुरुस्तीची कामे हाती घ्यावीत. तसेच, सततच्या पावसामुळे बीड ▶ उर्वरित पान २ वर

### डॉ.क्षीरसागरांचे निवेदन पाहताच मुख्य अभियंत्यांना जागेवर सूचना

**मध्यम व लघु प्रकल्पांच्या सांडव्यांची दुरुस्ती व लेखापरीक्षण करण्यात येणार आहे. तसेच, वाहून गेलेल्या पुलांच्या जागी नळकांडीऐवजी मोठे पूल उभारावेत, अशा सूचना अजितदादा पवार यांनी पाहणीदरम्यान मुख्य अभियंता अतुल चव्हाण यांना जागेवरच दिल्या आहेत.**

### निकष बाजूला अतिवृष्टीच्याच उपाययोजना व्हाव्यात

**सलग १३, १४, १५, १६ तसेच २१ व २२ सप्टेंबर रोजी झालेल्या मुसळधार पावसामुळे जिल्ह्यातील दररोजची सरासरी पर्जन्यमानाची टक्केवारी सुमारे ५० टक्क्यांपर्यंत पोहोचली आहे. शासनाच्या निकषानुसार अतिवृष्टी नोंदवण्यासाठी ६५ टक्के सरासरी पर्जन्यमान आवश्यक आहे. मात्र, पावसाच्या सलग सत्रामुळे शेतकऱ्यांचे प्रचंड नुकसान झाले असल्याने या पार्श्वभूमीवर निकषात बदल करून अतिवृष्टीच्याच उपाययोजना कराव्यात, अशी आग्रही मागणी करण्यात आली आहे.**



*पिंपळवाडी येथे पुराच्या पाण्यात वाहून गेलेला स्व.आदित्य कळसाने (वय ११) याच्या निवासस्थानी जाऊन डॉ.योगेश क्षीरसागर सांत्वनपर भेट दिली आणि तातडीने पंचनामा करण्याच्या सूचना तहसील प्रशासनाला दिल्या होत्या. आज अजितदादा पवार यांच्या हस्ते ४ लाख रुपयांचा मदतीचा धनादेश स्व.आदित्यचे चुलते सतीश सीताराम कळसाने यांच्याकडे सुपूर्द करण्यात आला. यावेळी डॉ.योगेश क्षीरसागर यांच्यासह जिल्हाधिकारी विवेक जॉन्सन, तहसीलदार चंद्रकांत शेळके, तलाठी श्रीमती.आरदट, सरपंच सुभाष बहिरवाळ, उपसरपंच गणेश बहिरवाळ, माजी सरपंच अर्जुन बहिरवाळ, युवराज बहिरवाळ, गणेश बहिरवाळ आदी मान्यवर उपस्थित होते.*

## थोडक्यात...

### जिल्हास्तरीय लोकशाही दिन ०६ ऑक्टोंबर

**बीड । प्रतिनिधी**

जिल्हाधिकारी विवेक जॉन्सन यांच्या अध्यक्षतेखाली जिल्हास्तरीय लोकशाही दिनाचे आयोजन सोमवार दि. ०६ आक्टोंबर २०२५ रोजी सकाळी १० ते दुपारी १२ या वेळेत जिल्हाधिकारी कार्यालयात करण्यात आले आहे. अर्जदाराने विहित नमुन्यातील अर्ज १५ दिवस अगोदर दोन प्रतीत सादर करणे आवश्यक आहे. लोकशाही दिनासाठी अर्ज देताना संबंधित तालुक्यातील तिसऱ्या सोमवारी तालुकास्तरीय लोकशाही दिनामध्ये अर्ज दिलेला असावा. तालुकास्तरीय लोकशाही दिनात एक महिन्यापेक्षा जास्त कालावधी होऊन देखील कोणतीही कार्यवाही झालेली नसावी, अशाच अर्जदारांनी टोकन क्रमांकाच्या पावतीसह अर्ज दोन प्रतीत सादर करावा. लोकशाही दिनामध्ये न्यायप्रविष्ट प्रकरणे, राजस्व, अपील, सेवाविषयक, आस्थापनाविषयक बाबी, विहित नमुन्यात नसणारे व आवश्यक ती कागदपत्रे न जोडलेले अर्ज स्वीकारण्यात येणार नाहीत. तालुकास्तरीय लोकशाही दिनातील टोकन क्रमांकाची तहसीलदार यांच्या स्वाक्षरीची पोहोच पावती, दिलेल्या मुदतीत व नमुन्यात ज्यांनी यापूर्वीच्या आवश्यक कागदपत्रासह अर्ज केले असतील त्यांना तक्रार मांडता येईल, असे जिल्हाधिकारी कार्यालयाने कळवले आहे.

### सांगलीचे तिरंगा गणेश मंडळ राज्यात पहिले

**सार्वजनिक गणेशोत्सव मंडळ स्पर्धेचा निकाल जाहिर**

**बीड । प्रतिनिधी**

महागणेशोत्सव महाराष्ट्राचा राज्य उत्सव अंतर्गत आयोजित करण्यात आलेल्या महाराष्ट्र राज्य उत्कृष्ट सार्वजनिक गणेशोत्सव मंडळ स्पर्धा २०२५ चा निकाल जाहिर झाला असून सांगलीच्या विटा तालुक्यातील तिरंगा गणेशोत्सव मंडळाने राज्यात प्रथम येण्याचा मान पटकविला आहे. लातूरचे वसुंधरा वृक्षारोपी गणेशोत्सव राज्यात दुसरे व सुवर्णयोग तरुण मंडळ अ. नगर यांनी राज्यात तृतीय क्रमांक मिळविला आहे. तसेच जिल्हास्तरीय प्रथम ,व्दितीय आणि तृतीय विजेत्याची घोषण करण्यात आली असून तालुकास्तरीय मंडळाची घोषणा शासनाव्दारे करण्यात आली आहे. राज्यस्तरीय व जिल्हास्तरीय प्रथम विजेत्यांचा पारितोषिक वितरण समारंभ गुरुवार दि. २५ सप्टेंबर २०२५ रोजी सकाळी ११.०० वाजता रवींद्र नाटयमंदिर, प्रभादेवी मुंबई येथे आयोजित करण्यात आला असून या समारंभात सांस्कृतीक कार्यमंत्री ड अशिष शेलार यांच्या हस्ते विजेत्या मंडळाचा पारितोषिक व सन्मानचिन्ह देऊन गौरव करण्यात येणार आहे. सर्व विजेत्यांचे सांस्कृतिक कार्यमंत्री ड अशिष शेलार यांनी अभिनंदन केले आहे.

### सरकारणे सरसकटपणे शेतकर्यांना आर्थिक मदत द्यावी शेतकरी बांधवांची चेष्टा करू नये ; विशाल इंगोले



**बीड । प्रतिनिधी**

सध्या सर्वत्र पावसाने हाहाकार माजवला आहे परिणामी नद्या, तळे पाण्यामुळे ओसंडून वाहत असल्याने हेच पाणी शेतात शिरल्याने शेताचे,पिकांचे, जनावरांच्या गोठ्याचे मोठे नुकसान होऊन अनेक ठिकाणी पशुधन मृत्यू पावले आहे हाता तोंडाशी आलेला शेतकर्यांचा घास पावसामुळे धुवून गेल्या कर्ज काढून पिके घेतलेले पावसामुळे नाहिशी झाली आता या कर्जाची परतफेड कशी करावी या चिंतेत सध्या बळीराजा दुखावला आहे पिक विमा भरला परंतु शासनाच्या धोरणामुळे तो ही बुडाला परंतु सरकारला याचे गांभीर्य राहिले नाही एक तर तुटपुंजी मदत जाहीर केली व पंचनामा, व्हिडिओ, फोटो पाहून नुकसान भरपाई देण्यात ऐणार असेल तर ते नियम टाळुन सरसकट तात्काळ आर्थिक मदत द्यावी व सरसकट शेतकरी बांधवांची पिक कर्ज माफी करावी व या दुःखातुन सावरण्यासाठी बळीराजाला बळ द्यावे असे विशाल इंगोले यांनी दिलेल्या निवेदनात म्हटले आहे.

### जिल्हास्तरीय शालेय कुस्ती स्पर्धेत चकलांबा शाळेचा संग्राम जाधव अव्वल



**गेवराई। प्रतिनिधी**

जिल्हा क्रीडा संकुल, बीड येथे गुरुवार दिनांक २५ सप्टेंबर २०२५ रोजी जिल्हास्तरीय शालेय कुस्ती स्पर्धा उत्साहात पार पडल्या. या स्पर्धांमध्ये जिल्हा परिषद माध्यमिक शाळा, चकलांबा येथील विद्यार्थी संग्राम राधाकिसन जाधव याने घवघवीत यश संपादन करून शाळेचा आणि गावाचा मान उंचावला. १७ वर्षे वयोगटातील ग्रिको रोमन प्रकारातील ६५ किलो खालील वजन गटामध्ये संग्राम जाधवने दमदार खेळ करत प्रतिस्पर्ध्यांना पराभूत केले आणि जिल्ह्यात प्रथम क्रमांक पटकावला. त्याच्या या विजयामुळे त्याची निवड आता छत्रपती संभाजीनगर येथे होणाऱ्या विभागीय कुस्ती स्पर्धेसाठी झाली आहे. संग्रामच्या या यशामागे शाळेचे शारीरिक शिक्षक आहेर एम.बी. सर यांचे मार्गदर्शन, मुख्याध्यापक मा. गरकळ सरांचे प्रोत्साहन, तसेच वर्गशिक्षक, सर्व शिक्षकवृंद आणि शिक्षकेतर कर्मचाऱ्यांचे सहकार्य मोठ्या प्रमाणावर लाभले. ग्रामीण भागातील या विद्यार्थ्याने केलेल्या कष्टांमुळे व जिद्दीमुळे त्याने हा मानाचा टप्पा गाठला आहे. या उल्लेखनीय कामगिरीबद्दल संग्रामचे अभिनंदन करताना शिक्षक व प्रशालेतील सहाध्यायींनी त्याला आगामी विभागीय स्पर्धेसाठी शुभेच्छांचा वर्षाव केला.

## आमदार सुरेश आण्णा धस मित्र मंडळाच्या वतीने कुटुंबांना किराणा किट वाटप

**पाटोदा । प्रतिनिधी**

पाटोद्यात मुसळधार पावसाने कहर केला असून अनेक भागात पूरस्थिती निर्माण झाली आहे. शेतकऱ्यांचे पिके वाहून गेली, घरे उद्धवस्त झाली आणि शेकडो कुटुंब उपासमारीच्या छायेत सापडली आहेत.अशा गंभीर परिस्थितीत आमदार सुरेश आण्णा धस मित्र मंडळ मदतीसाठी पुढे सरसावले. घरोघरी जाऊन आमदार सुरेश आण्णा धस मित्र मंडळाच्या कार्यकर्त्यांनी धान्य, तांदूळ, डाळी, तेल, साखर, मीठ, मसाले यांसारख्या जीवनावश्यक वस्तूंचा समावेश असलेली किराणा किटे पूरग्रस्तांना दिली.या उपक्रमामुळे शेकडो कुटुंबांना तातडीचा दिलासा मिळाला असून लोकांच्या डोळ्यांत कृतज्ञतेचे अश्रू दाटले. ▶ उर्वरित पान २ वर



## दुष्काळग्रस्त शेतकऱ्यांना संकटातून बाहेर काढण्यासाठी माजलगाव एसबीआय बँकेचे कर्मचारी फिल्डवर

**माजलगाव । प्रतिनिधी**

बीड जिल्ह्यासह मराठवाड्यात पावसाने घातला आहे अनेक शेतकऱ्यांची शेती, जनावरे पूर्णतः वाहून गेली आहेत तर घरादारांची पडझड झाल्यामुळे अनेकांचे संसार उघड्यावर पडले आहेत अशा दुष्काळग्रस्त शेतकऱ्यांना संकटातून बाहेर काढण्यासाठी माजलगाव एसबीआय शाखेचे कर्मचारी स्वतः गावा गावात जाऊन शेतकऱ्यांच्या व्यथा ऐकून त्यावर अर्थपूर्ण सहकार्य करण्यात प्रयत्नशील राहू त्यामुळे शेतकऱ्यांना एक प्रकारे मोठा दिलासा मिळत आहे. मुख्य प्रबंधक प्रमोद इलमकर, सहाय्यक महाप्रबंधक बी एस नेगी, शाखा व्यवस्थापक माजलगावचे जी सी मुदली यांनी माजलगाव तालुक्यातील गावा गावात जाऊन दुष्काळग्रस्त शेतकऱ्यांच्या व्यथा ऐकून घेऊन त्यांचे अश्रू पुसण्याचे काम केले आहे शेतकऱ्याने घाबरून जाऊ नये माजलगावची ▶ उर्वरित पान २ वर

## हिवरसिंगा ग्रामस्थांचे अजित पवार यांना विविध मागण्यांचे निवेदन

**शिरूर । प्रतिनिधी**

सप्टोंबर महिन्यातील झालेले अतिवृष्टेने रायमोह मंडळातील अतिवृष्टी नुकसान पाहणीसाठी ना.अजित पवार पालकमंत्री यांचा दौरा निमित्ताने मौ.हिवरसिंगा शिरूर का जि.बीड येथे उपस्थित ग्रामस्थ यांच्याशी संवाद यावेळी ग्राम स्थांच्या व कुटे-बडे वस्तीवरील रहिवासी यांनी मौ.नदीवर लक्ष्मीआई मंदिर वस्ती,शिंदे-तिंकाडे वस्ती,कुटे-बडे वस्ती ३ ठिकाणी पूल उभारणे आवश्यक आसल्याचे तसेच सिद्धेश्वर नगर येथील रेल्वे पूलाखीली पाणी साठवून वळनरस्ता व सिद्धेश्वर नगर, शिंदेवस्ती, ▶ उर्वरित पान २ वर



## महाराष्ट्रात ओला दुष्काळ जाहीर करा व विद्यार्थ्यांचे शैक्षणिक शुल्क माफ करा : एसएफआय

**राज्याच्या मुख्यमंत्र्यांना विद्यार्थ्यांनी तहसीलदार यांच्यामार्फत पाठवले निवेदन**

**वडवणी । प्रतिनिधी**

गेल्या काही दिवसापासून महाराष्ट्रामध्ये बीड जिल्ह्यातील सर्वच तालुक्यासह, मराठवाड्यात व राज्यातील इतर भागात मोठ्या प्रमाणात पाऊस पडला असल्याने शेतकऱ्यांच्या पिकाचे मोठ्या प्रमाणात नुकसान झाले आहे. या आसमानी संकटाने शेतकरी राजा मोठ्या संकटात सापडला आहे. यामुळे अनेक शेतकरी कुटुंब व नागरिक बेघर झाले आहेत तर अनेकांवर उपासमारीची वेळ आली आहे. अशा परिस्थितीत शेतकऱ्याच्या ▶ उर्वरित पान २ वर



## ओला दुष्काळ जाहीर करून नुकसान भरपाई द्या : राजेंद्र आमटे



**अजित पवार यांना निवेदन**

**बीड । प्रतिनिधी**

बीड जिल्हा सह मराठवाड्यात पावसाने कहर मांडला आहे. अनेक शेतकऱ्यांचे कुटुंब उध्वस्त झाले आहे. अतिवृष्टीमुळे शेतकऱ्यांचे अतोनात नुकसान झाले असून ओला दुष्काळ जाहीर करून त्वरित मदत करण्यात यावी असे मागणी शिवसंग्राम किसान आघाडीचे जिल्हाप्रमुख राजेंद्र आमटे यांनी पालकमंत्री अजित पवार यांना दिलेल्या निवेदनात केली आहे. बीड जिल्ह्यासह मराठवाड्यात अतिवृष्टी मुळे शेतकऱ्याचे मोठ्या प्रमाणात नुकसान झाले आहे नदी काठची जमीन वर्षात झाली आहे सर्व पीक पाण्याने वाहून गेले आहे अनेकांच्या जमिनी वाहून गेले आहेत. ▶ उर्वरित पान २ वर

**म्हाळस जवळा महसूल मंडळ मधील गावांचा अतिवृष्टी नुकसान भरपाई यादीत समावेश करण्यात आला नव्हता मात्र यावेळी विनंती केली असता जिल्हाधिकारी विवेक जॉन्सन यांना म्हसळा जवळा महसूल मंडळ समावेश करण्याच्या सूचना ना. अजित पवार यांनी दिल्या. जिल्हाधिकारी यांनी म्हाळस जवळा महसूल मंडळ समावेश करण्यात येईल असे सांगितले.**

## पुरग्रस्त शेतकऱ्यांसाठी शिवसेनेच्या नवरात्रातील स्पर्धा रद्द : सचिन मुळूक

**स्पर्धेची रक्कम शेतकऱ्यांच्या मदतीसाठी जिल्हाधिकाऱ्यांकडे सुपूर्द करणार**

**बीड । प्रतिनिधी**



नवरात्रोत्सवाच्या पार्श्वभूमीवर शिवसेनेच्या वतीने लाडक्या बहिणींसाठी विविध सांस्कृतिक स्पर्धांचे आयोजन करण्यात आले होते. मात्र गेल्या काही दिवसांत झालेल्या मुसळधार पावसामुळे जिल्ह्यातील अनेक शेतकऱ्यांचे हातचे पिके वाहून गेली, घरांची पडझड झाली आणि जनजीवन विस्कळीत झाले. या गंभीर परिस्थितीची दखल घेत शिवसेनेने सामाजिक बांधिलकी जपत महत्त्वाचा निर्णय घेतला आहे. लाडक्या बहिणींसाठी आयोजित सर्व स्पर्धा रद्द करून त्यावर होणारा खर्च थेट शेतकऱ्यांच्या मदतीसाठी जिल्हाधिकाऱ्यांकडे जमा करण्यात येणार ▶ उर्वरित पान २ वर

## महिला डॉक्टर्स असोसिएशनने महिलांची केली आरोग्य तपासनी

**गेवराई । प्रतिनिधी**

डॉ. रचना मोटे, डॉ. पल्लवी झोडपे, डॉ. कोमल काळे, डॉ. अमरजा पवार आणि डॉ. रचना शेळके या गेवराई शहरातील डॉक्टरानी आज मौजे नांदूर हवेली ता. बीड या पुरग्रस्त गावांत महिलांची मोफत तपासणी आणि उपचार करून त्यांना अत्यावश्यक साहित्य मोफत वाटप केले. एक माणुसकीचा हात... म्हणून या महिला डॉक्टरांनी दिलेली सेवा पूरग्रस्तांसाठी मोलाची ठरली आहे. सध्या अनेक भागांत पूरपरिस्थितीमुळे नागरिकांचे जनजीवन विस्कळीत झाले ▶ उर्वरित पान २ वर



### स्त्रीशक्तीची खरी ओळख

**महिला डॉक्टरांनी केवळ वैद्यकीय मदतच नाही दिली, तर पूरग्रस्त महिलांशी संवाद साधून त्यांना मानसिक आधारदेखील दिला. अनेक महिलांनी आपली समस्या मोकळेपणाने सांगता यावी म्हणून महिला डॉक्टर असल्याचे विशेष स्वागत केले. या संवादातून एक प्रकारचा आत्मविश्वास आणि सकारात्मक ऊर्जा पूरग्रस्त महिलांमध्ये निर्माण झाली.**

### मोफत सेवा, माणुसकीची भावना

**या सेवांमध्ये तपासणीसाठी कोणतेही शुल्क घेतले गेले नाही. औषधे, सॅनिटरी नॅपकिन्स, मलम पट्टी साहित्य, प्राथमिक आरोग्य तपासणी साहित्य याचे वितरणही मोफत करण्यात आले.**